# डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ

पो. लोणेरे ४०२१०३ ता. माणगाव, (कोकण रेल्वे), जि. रायगड, महाराष्ट्र राज्य,

मान्यता : महाराष्ट्र शासन कायदा २०१४ चा २९

www.dbatu.ac.in Email : registrar@dbatu.ac.in, Ph. (02140)275142


क्रमांक : डॉबाआंतंवि/आस्था/कोव्हीड-१९/२०२२/६६

दिनांक : ०८/०१/२०२२

**परिपत्रक :**

**विषय** : वेगाने वाढत असलेल्या कोव्हीड-१९ व ओमायक्रॉनच्या रुग्णांची वाढती संख्या पाहता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून विद्यापीठातील शिक्षक/अधिकारी/शिक्षकेतर कर्मचारी/एकत्रित वेतनावरील कर्मचारी/रोजंदारी कर्मचारी यांची दि. १५/०२/२०२२ पर्यंत ५०% उपस्थिती व वर्क फ्रॉम होमचे नियोजन करणे.

**संदर्भ** : उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.०६/विशि-३, दि. ०७/०१/२०२२.

उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकान्वये कोव्हीड-१९ च्या संभाव्य तिस-या लाटेमुळे राज्यामध्ये बाधित रुग्णांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत असून ओमायक्रॉन या नव्या व्हेरियंटमुळे बाधित रुग्णांची संख्यासुध्दा मोठया प्रमाणावर वाढत आहे. समुह संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी आजपासून दि. १५ फेब्रुवारी,२०२२ पर्यंत खालील आदेश लागू करण्यात येत आहेत.

०१. विद्यापीठातील सर्व शैक्षणिक वर्ग प्रत्यक्ष ऑफलाईन पध्दतीने न घेता दि. १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत ऑनलाईन सुरु ठेवण्यात यावेत

०२. विद्यापीठातील परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात यावी. विजेची अनुपलब्धता किंवा नेटवर्क कनेक्टीविटी नसल्यामुळे किंवा विद्यार्थी त्यांचे कुटुंबीय कोरोना बाधित असल्यास किंवा आरोग्यविषयक इतर समस्यांमुळे विद्यार्थी परिक्षा देऊ शकला नाही तर अशा विद्यार्थ्यांची ऑनलाईन पध्दतीने पुनर्परिक्षा घेण्यात यावी. परिक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

०३. परिक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणा-या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी संबंधित विभागांनी हेल्पलाईनची व्यवस्था करावी. परिक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी संकेतस्थळावर परिक्षांचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नसंच, हल्पलाईन नंबर इ. स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करुन द्यावी.

०४. विद्यापीठातील उपलब्ध असलेली वसतिगृहे बंद ठेवावीत. स्थानिक प्राधिकरणांना कोव्हीड केअर सेंटर म्हणून वसतिगृहांची आवश्यकता असल्यास ती संबंधित वसतिगृह अधिक्षकांनी कुलसचिव यांच्याकडे निर्णय घेऊन उपलब्ध करुन द्यावीत.

०५. संबंधित विभागांनी अद्याप लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांची यादी देऊन लसीकरणासाठी विशेष माहिम राबवून तसेच विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करुन तातडीने लसीकरण पूर्ण करुन घ्यावे.

०६. ज्या शिक्षकीय/शिक्षकेतर कर्मचा-यांचे दोन लसीकरण डोस झालेले नाही त्यांचा तपशिल उपलब्ध करुन देऊन संबंधित विभागांशी संपर्क साधून विशेष मोहिम राबवून लसीकरण पूर्ण करुन घेण्यात यावे.

08.01.2022

२/-

Scanned by Scanner Go

०७. विद्यापीठ व इंस्टिटयुटमधील शिक्षकीय व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती ५०% करण्यात येत असून चक्राकार पध्दतीने त्यांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत व वर्क फ्रॉम होम बाबत संबंधित विभागाने नियोजन करावे. तसेच उपस्थितीबाबत मेस्टर तयार करुन त्याची प्रत कुलसचिव यांना सादर करावी.

०८. १५ फेब्रुवारी, २०२२ नंतर शासनाच्या निर्देशानूसार पुढील परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

08.01.2022

( डॉ. भगवान फ. जोगी )
कुलसचिव

प्रति,

०१. प्राचार्य, इंन्स्टिटयुट ऑफ पेट्रोकेमिकल इंजिनिअरिंग, लोणेरे
०२. सर्व विभाप्रमुख/नियंत्रक यांच्या मार्फत कर्मचा-यांना परिभ्रमणार्थ.
०३. परिक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे
०४. लेखा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

प्रत : माहिती करीता सविनय सादर
मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे

Scanned by Scanner Go